महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा घोडविंदे (एम.डी.)

गुरुवार ■ ११ सप्टेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक - ०७९ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत ०२ रुपये

# नेपाळमध्ये अडकलेल्या भारतीय नागरिकांसाठी सरकारची मदत



## नेपाळमध्ये अडकलेल्या ठाणे जिल्ह्यातील पर्यटक नागरिकांची नावे

Ravindra Godale, Chottaram Mahadse, Ravindra Gaikwad, Mahesh Sakhare, Jeevan Parse, Anand Phopale, Ganesh Sholap, Prashant Kadu, Amol Shelar, Ashok Patil, Sanjay Wagh, Anil Vishe, Pawan Pawar, Pratik Sarnobat, Ganesh Shinde, Sandeep Patil, Ganesh Kadam, Vijay Mule, Chandrakant Mule


Sandeep Deshmukh, Devkant Sure, Sandeep Shelar, Ganesh Wagh, Sandeep Wagh, Ganesh Godse, Vaishali Shewale, Subhash Shewale, Savita Shewale, Subhash Pathe, Somnath Bengal, Salim Manore, Nisha Manore, Sudhir Telvane, Sumita Telvane, Sudam Lolekar, Nikita Lolekar, Sandeep Kakalkar, Rosha Kakalkar

Somnath Bakode, Sanjay Pathare, Anita Gondhali, Sangeeta Rajat, Santosh Waghmare, Salima Mali, Prakash Gaikwad, Raju Gaikwad, Umarsha Chaudhary, Parshuram Avachivale, Bhaskar Karale, Parsaram Chaudhary, Parshuram Agivale, Madhukar More, Leela More, Vitthal Agivale

Janabai Agivale, Ananta Deshale, Bhagwan Bankari, Rambhau Dhawali, Kamal Bangare, Darshan Vishe Sonawane, Suresh Sonawane, Sidhu Ben Isalkar, Raju Isalkar, Ramesh Bhondre, Sheetal Chirag Bhuva, Chirag Bhuva, Binodkumar Jhanwar, Rajendra Prasad Jhanwar, Meera Praveen

Pawadshettar, Milind Bhimrao Chaudhari, Rajashree Suhas Jangle, Milind Girish Gokhale, Sunanda Milind Gokhale, Sheetal Chirag Bhuva, Chirag Rajesh Bhuva, Rohit Ananthanarayanan, Sudha Prabhu, Namrata Singh

ठाणे जिल्ह्यातील ११२ पर्यटक नेपाळमध्ये सुरू असलेल्या दंगलीत अडकले आहेत, असून मुरबाड तालुक्यातील 42 पर्यटक आहेत, अशी माहिती मुरबाडचे आमदार किसन कथोरे यांनी दिली.



दै. ठाणे जीवनदीप वार्ता
बातमीदार

नेपाळमध्ये सध्या सुरू असलेल्या राजकीय अस्थिरता आणि निदर्शनांमुळे महाराष्ट्रातील १०० पेक्षा जास्त नागरिक अडकले आहेत. या परिस्थितीमुळे त्यांच्या सुरक्षिततेबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी या संदर्भात माहिती देताना सांगितले की, अडकलेल्या सर्व नागरिकांशी संपर्क साधण्यात आला आहे आणि त्यांच्या सुरक्षिततेची खात्री करण्यासाठी भारतीय दूतावासाच्या अधिकाऱ्यांशी सातत्याने संपर्क साधला जात आहे.

गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी दिलेल्या माहितीनुसार, नेपाळमध्ये अडकलेल्या महाराष्ट्रातील नागरिकांच्या मदतीसाठी सरकार पूर्णपणे कटिबद्ध आहे. अडकलेल्या नागरिकांशी संपर्क साधून त्यांना आवश्यक ती मदत पुरवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. सरकारने एक विशेष हेल्पलाइन क्रमांकही जारी केला असून, या क्रमांकावर संपर्क साधून अडकलेले नागरिक किंवा त्यांचे नातेवाईक मदत मिळवू शकतात. भारतीय दूतावास या नागरिकांना सुरक्षित ठिकाणी पोहोचवण्यासाठी आणि आवश्यक सोयीसुविधा पुरवण्यासाठी प्रयत्न करत आहे.

सध्या नेपाळमध्ये प्रवास टाळावा. जे नागरिक सध्या नेपाळमध्ये आहेत त्यांनी आपल्या निवासस्थानीच सुरक्षित राहावे. अनावश्यकपणे बाहेर पडू नये व स्थानिक प्रशासनाच्या तसेच भारताच्या दूतावासाच्या सूचनांचे पालन करावे. कोणत्याही प्रकारच्या मदतीसाठी दूतावासाच्या हेल्पलाइन क्रमांकांवर संपर्क साधावा. +977-980 860 2881 (व्हॉट्सअॅप कॉलसाठीही उपलब्ध)

+977-981 032 6134 (व्हॉट्सअॅप कॉलसाठीही उपलब्ध) राज्य आपत्कालीन कार्य केंद्र, महाराष्ट्र, नागरिकांच्या सुरक्षेसाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करत आहे. कृपया अधिकृत माध्यमांद्वारेच माहिती प्राप्त करावी व अफवांपासून दूर राहावे, असे आवाहनही राज्य आपत्कालीन कार्य केंद्रामार्फत करण्यात आले आहे. राज्य आपत्कालीन कार्य केंद्र, महाराष्ट्र (91- 9321587143 व्हॉट्सअॅप कॉलसाठीही उपलब्ध 91- 8657112333 व्हॉट्सअॅप कॉलसाठीही उपलब्ध केला आहे.

## लक्षवेधी




# डोंबिवलीत विजेचा लपंडाव

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : डोंबिवली : शहरातील गरिबाचा वाडा, महाराष्ट्र नगर, गोपीनाथ चौक परिसर आदी भागात सकाळ-संध्याकाळ सातत्याने दीड ते दोन तास वीज पुरवठा खंडीत होत आहे. सातत्याने सुरु असलेल्या या विजेच्या लपंडावाने नागरिक हैराण झाले आहेत. वीज पुरवठा खंडित झाल्यास महावितरणच्या संपर्क क्रमांकावर संपर्क साधला असता तेथील दुरध्वनी उचचला जात नाही, त्यामुळे नागरिक आणखी त्रस्त होत आहेत.

महावितरणच्या गरीबाचावाडा विभाग अंतर्गत महाराष्ट्र नगर, गोपीनाथ चौक परिसरत येतो. गेल्या काही दिवसांपासून सकाळी दहा वाजता वीज पुरवठा खंडित झाला की त्यानंतर दीड ते दोन तास वीज पुरवठा गायब असतो. वीजपुरवठा सुरू झाला की त्यानंतर विजेचा लपंडाव दिवसभर सुरु राहतो. संध्याकाळी पुन्हा वीजपुरवठा खंडित झाला की त्यानंतर दोन तास वीजपुरवठा गायब असतो. महावितरणच्या स्थानिक कर्मचाऱ्यांना यासंदर्भात संपर्क केला की त्यांचे मोबाईल फोन बंद असतात.

# राजयगडमधील शेतकऱ्यांची पिकविम्याकडे पाठ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अलिबाग, ता. १०** : खरीप हंगामातील आपत्कालीन परिस्थितीत शेतकऱ्यांच्या पिकांना विम्याच्या माध्यमातून आर्थिक आधार मिळावा, म्हणून प्रधानमंत्री पीक विमा योजना सुरू करण्यात आली आहे; पण या योजनेला रायगड जिल्ह्यातून अल्प प्रतिसाद मिळाला आहे. पेरणी न होणे, पूर, दुष्काळ, पावसातील खंड यामुळे होणारे नुकसान, गारपीट, भूस्खलन, क्षेत्र जलमय होणे, वीज कोसळणे, ढगफुटी अशा स्थानिक नैसर्गिक आपत्तींमुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी विमा संरक्षण देण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. रायगड जिल्ह्यात अॅग्रीकल्चरल इन्शुरन्स कंपनीमार्फत पीक विमा योजना राबवली. पीक विम्याची नोंदणीसाठी कंपनीमार्फत जनजागृती करण्यात आली होती. शेतावर जाण्यापासून वेगवेगळ्या बैठकीच्या माध्यमातून विमा नोंदणीचे आवाहन करण्यात आले होते; पण जिल्ह्यातील फक्त नऊ हजार ९१७ शेतकऱ्यांनी तीन हजार ८३४ हेक्टर क्षेत्रासाठी नोंदणी केली आहे. त्यामुळे या योजनेला जिल्ह्यातून अपेक्षित प्रतिसाद मिळाला नसल्याचे चित्र आहे.

# आरोग्यसेवेला बळकटी

## दहा आयुष्मान आरोग्य केंद्रांचा आज शुभारंभ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे, ता. 10** : ठाणे महापलिका क्षेत्रातील आरोग्यसेवा अधिक बळकट व्हावी, यासाठी पालिकेच्या आरोग्य विभागाकडून प्रयत्न करण्यात येत आहे. त्यानुसार पालिका क्षेत्रात ६८ ठिकाणी नव्याने आयुष्मान आरोग्य मंदिर सुरू करणार आहे. पहिल्या टप्प्यात १० ठिकाणी हे केंद्र उभारण्यात येणार असून, त्याचा शुभारंभ ११ सप्टेंबर रोजी करण्यात येणार आहे. गोरगरीब नागरिकांसाठी पालिकेचे छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय वरदान ठरत आहे. त्याचबरोबर प्राथमिक आरोग्यसेवेसाठी ३३ प्राथमिक आरोग्य केंद्र आणि सहा प्रसूतिगृह कार्यरत आहेत. असे असताना, दुसरीकडे केंद्र सरकारमार्फत महापालिका हद्दीत २०२१-२२ या कालावधीत १२ व २०२२-२३ या कालावधीत ५६ असे एकूण ६८ नागरी आयुष्मान आरोग्य मंदिर मंजूर झाले आहेत. त्यासाठी महापालिकेच्या मालकीच्या ५१ जागा उपलब्ध झाल्या असून १० केंद्रे यापूर्वीच सुरू झाली आहेत, तर ५१ पैकी ३० जागांवर आता पोर्टा कॅबीनच्या माध्यमातून हे दवाखाने सुरू केले जाणार आहेत. पालिकेच्या आरोग्य विभागाने काढलेल्या निविदेला प्रतिसाद मिळाल्याने आता येत्या ११ सप्टेंबर रोजी १० ठिकाणी आरोग्य मंदिर सुरू होणार आहे.

# ठाणे जिल्ह्यातील नागरिकांना घरपोच शासकीय सेवा



## ८० विभागांच्या तब्बल ४०२ सेवा आता नागरिकांच्या दारी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
ठाणे/ दि. 10

सामान्य नागरिकांना सरकारी सेवा त्यांच्या दारातच सहज, सुलभ आणि जलदगतीने उपलब्ध व्हाव्यात, यासाठी ठाणे जिल्हा परिषदेने एक क्रांतिकारी पाऊल उचलले आहे. 'Door Step Delivery' या अभिनव उपक्रमामुळे जिल्ह्यातील ४३१ ग्रामपंचायतींमध्ये नागरिकांना घरबसल्या शासनाच्या विविध सेवा मिळत आहेत. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम लोकाभिमुख व परिणामकारक ठरत आहे.

सर्वसामान्य नागरिकांना त्यांच्या दारी सेवा उपलब्ध करून देणे, हेच खऱ्या अर्थाने सुशासनाचे प्रतीक आहे. 'Door Step Delivery' उपक्रमाद्वारे आम्ही प्रशासन आणि जनतेतील अंतर कमी करत आहोत. हा उपक्रम प्रत्येक गावात, प्रत्येक घरापर्यंत पोहोचवण्याचा आमचा संकल्प आहे. ठाणे जिल्ह्यातील नागरिकांनी घरपोच जलद व सुलभ प्रशासकिय दाखले घेण्यासाठी 'Door Step Delivery' प्रणालीमार्फत सेवा घ्यावे, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी केले आहे. या प्रणालीद्वारे नागरिकांना घरबसल्या ४०२ प्रकारच्या शासकीय सेवा मिळू शकतात. पान ०३ वर ▶▶▶









## मीरा-भाईंदरची तहान भागविण्यासाठी

# ११६ कोटींच्या कर्जाला मंत्रिमंडळाची मंजूरी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : मीरा-भाईंदर महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा प्रकल्पासाठी ११६ कोटी २८ लाख रुपयांचे कर्ज उभारणी करण्याच्या प्रस्तावास महायुती मंत्रिमंडळाने मंगळवारी मंजुरी दिली. त्याचबरोबर नगरपालिका संस्थांना पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी जुळणारे निधी उभारण्यास मदत करण्यासाठी नागरी पायाभूत सुविधा विकास कर्ज योजनेंतर्गत गृहनिर्माण आणि शहरी विकास महामंडळ लिमिटेड (हुडको) कडून २ हजार कोटी रुपये उभारण्यास मान्यता देण्यात आली.

अटल मिशन फॉर रिजुव्हेनेशन अँड अर्बन ट्रान्सफॉर्मेशन (अमृत) २.०, स्वच्छ भारत मिशन २.०, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान आणि इतर राज्य/केंद्रीय उपक्रमांतर्गत प्रकल्प निधीअभावी थांबू नयेत यासाठी ही योजना तयार करण्यात आली आहे. या निर्णयामुळे छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेला पाणीपुरवठा प्रकल्पासाठी ८२२.२२ कोटी रुपये, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला चार सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांसाठी २६८.८४ कोटी रुपये आणि मीरा-भाईंदर महानगरपालिकेला पाणीपुरवठा प्रकल्पासाठी ११६.२८ कोटी रुपये मिळतील.

## वाचक मनोगत

### बॅलट पेपरची कमाल

सी.पी.राधाकृष्णन जिंकले, भारताचे उपराष्ट्रपती बनले! सत्ताधारी आणि समर्थन करणाऱ्या इतर पक्षांच्या 438 खासदारांनी त्यांच्यासाठी मतदान केले पण मतमोजणी झाली तेंव्हा त्यांना 452 मते मिळाली होती. विरोधी पक्षांच्या एकूण 315 खासदारांनी मतदान केले पण त्यांच्या उमेदवाराला 300च मते मिळाली. विशेष म्हणजे हे सगळं बॅलट पेपर वर झालंय. म्हणूनच राजीव गांधी यांनी EVM आणली होती..

- सुनिल इंगळे, सामाजिक कार्यकर्ते, कल्याण.

### उपराष्ट्रपती महोदयांचे हार्दिक अभिनंदन

भारताचे उपराष्ट्रपती म्हणून सी. पी, राधाकृष्णन हे विजयी झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन!. महाराष्ट्राचे राज्यपाल पद त्यांनी कोणतेही वादग्रस्त विधान न करता व वादग्रस्त कृती न करता सांभाळले व राज्यपाल पदाची शान राखली.निष्पक्ष व लोकशाही पद्धतीने संविधानाचा सन्मान उंचावून त्यांनी उपराष्ट्रपती पदाची शानही वाढवावी. सर्व सामान्य भारतीय नागरिक म्हणून त्यांच्या कारकीर्दीसाठी हार्दिक शुभेच्छा!

- सुनिल इंगळे, सामाजिक कार्यकर्ते, खडकपाडा, कल्याण.

# अवैध रेती उत्खनन प्रकरणी तहसील पथकाच्या कारवाईचा बडगा



## ३४ लाखांची साधनसामग्री केली नष्ट

दै.ठाणे जीवनदीप वार्ता /कल्याण : मोठा गाव खाडी परिसरात कल्याण तहसीलदार पथकाने गस्ती दरम्यान दोन बार्ज व दोन सक्शन पंप अवैध रेती उत्खनन करताना आढळल्याने धडक कारवाई चा बडगा उगारीत २ बार्ज व एक स्कंशन पंप गैस कटर ने तोडण्यात आले. तर एक स्कंशन पंप जागीच बुडवित सुमारे 34 लाखांची साधनसामग्री नष्ट केल्याची कारवाई मंगळवारी केली.

तहसील सूत्रांकडून प्राप्त माहिती नुसार मंगळवारी तहसीलदार कल्याण यांच्या पथकाने उल्हास खाडी भागातील मुंब्रा खाडी ते मोठागाव खाडी गस्त केली असता. मोठा गाव खाडी परिसरामध्ये दोन बार्ज व दोन सक्शन पंप अवैध रेती उत्खनन करीत असताना आढळून आले. निवासी नायब तहसीलदार कल्याण, अप्पर कल्याण मंडळ अधिकारी व शिपाई कोतवाल यांनी मोठा गाव डोंबिवलीच्या खाडीत अवैधरित्या वाळू उपसा करत असणाऱ्या २ बार्ज व २ सक्शन पंप ताब्यात घेतले.

कारवाई दरम्यान एक सक्शन पंप जागेवरन बोटीतील लोकांनी पाणी सोडल्याने ओढून आणणे शक्य नसल्याने जागीच बुडवला असून, कारवाई करत असताना बोटीवरील लोकांनी उड्या मारुन पळ काढला. तर राहिलेल्या २ बार्ज व एक सक्शन पंप गॅस कटर ने तोडण्यात आले. या कारवाई मध्ये अवैध रेती उत्खनना करता वापरल्या जाणाऱ्या सुमारे 34 लाखांची साधनसामग्री नष्ट करण्यात आली.

कल्याण तहसीलदार सचिन शेजाळ यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की,अवैध रेती उपसा प्रकरणी खाडी भागात कारवाई सुरू असते आजच्या कारवाईत अवैध रेती उत्तखन्न प्रकरणी रात्री उशीरा पर्यंत कारवाई करीत अवैध रेती उत्तखन्न करणारी 34 लक्ष रु साधन सामुग्री नष्ट करण्यात आली असून यापुढे ही अवैध रेती उत्तखन्न कारवाई तीव्र केली जाणार आहे.

कल्याण तहसीलदार पथकाच्या अवैध रेती उत्तखन्न कारवाई बडग्यामुळे अवैध रेती उत्तखन्न करणार्या रेती माफियांचे धाबे दणाणले असल्याचे चित्र यानिमित्ताने दिसत आहे.

# 'प्रत्येक संवादात शौर्य प्रत्येक प्रयोगात देशभक्ती

## 'शहीद कॅप्टन विनायक गोरे' नाटिकेचा पाच हजारावा प्रयोग



## मनोज सानप यांचा ऐतिहासिक प्रवास

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : शौर्य, त्याग आणि देशभक्ती या मूल्यांचे स्मरण करणे ही केवळ औपचारिकता नसून ती प्रत्येक भारतीयाची जबाबदारी आहे. या जबाबदारीचे पालन गेली जवळजवळ तीस वर्षे अखंडपणे करत असलेले एक व्यक्तिमत्व म्हणजे ठाणे जिल्ह्याचे माहिती अधिकारी मनोज सुमन शिवाजी सानप. त्यांनी "शहीद कॅप्टन विनायक गोरे" या एकपात्री नाटिकेच्या माध्यमातून देशभक्तीचा संदेश सतत जिवंत ठेवला आहे. या नाटिकेचा पाच हजारावा प्रयोग १३ सप्टेंबर रोजी सोमय्या महाविद्यालयात रंगणार असून, तो संपूर्ण महाराष्ट्रासाठी अभिमानाचा ठरणार आहे.

२६ सप्टेंबर १९९५ रोजी जम्मू-काश्मीरच्या सीमारेषेवर केवळ २७ वर्षांचा असलेला कॅप्टन विनायक गोरे यांनी शत्रूंशी लढताना मातृभूमीसाठी बलिदान दिले. या वीराच्या स्मृतींना वंदन करण्यासाठी आणि समाजमनात राष्ट्रभक्तीची ज्योत पेटवण्यासाठी त्याच काळात एनसीसी कॅडेट असलेल्या मनोज सानप यांनी दुसऱ्याच दिवशी, म्हणजे २७ सप्टेंबर १९९५ रोजी आपल्या के.जे. सोमय्या कॉलेजात ही लघुनाटिका प्रथम सादर केली. तेव्हापासून सुरू झालेला प्रवास आज ५,००० व्या प्रयोगापर्यंत पोहोचला आहे.

एक साधीशी पंधरा मिनिटांची नाटिका, परंतु त्यातील प्रत्येक संवाद, प्रत्येक नजर, प्रत्येक शब्द अंगावर रोमांच उभा करणारा ठरतो. प्रेक्षकांच्या डोळ्यांतून अश्रू वाहतात, पण ते दु:खाचे अश्रू नसतात, तर आपल्या मातृभूमीबद्दलच्या अभिमानाचे असतात. गेली तीन दशके या नाटिकेच्या माध्यमातून शेकडो शाळांतील विद्यार्थी, हजारो महाविद्यालयीन युवक आणि असंख्य नागरिक यांनी प्रेरणा घेतली. कित्येक युवक सैन्यात दाखल झाले, तर काहींनी रक्तदान, अवयवदान, सैनिकांच्या कुटुंबांचा सन्मान, समाजोपयोगी कार्य अशा विविध मार्गांनी देशसेवा सुरू केली.

मनोज सानप यांनी कधीही या प्रवासाला वैयक्तिक लाभाचे साधन बनवले नाही. पुरस्कार, मान्यता किंवा आर्थिक फायद्याची अपेक्षा न ठेवता त्यांनी केवळ राष्ट्रभक्तीची मशाल जिवंत ठेवली. त्यांचा प्रत्येक प्रयोग म्हणजे एक प्रकारे लहानसा समाजजागरणाचा सोहळाच ठरला. आजच्या भौतिकवादाने पछाडलेल्या युगात, सोशल मीडियाच्या आहारी गेलेल्या तरुण पिढीला या नाटिकेतून मिळणारे संदेश म्हणजे एक प्रकारचे प्राणवायू ठरले आहेत.

१३ सप्टेंबर २०२५ रोजी सोमय्या कॉलेजच्या फाउंडेशन डे च्या विशेष सोहळ्यात हा पाच हजारावा प्रयोग सादर होणार आहे. ज्या महाविद्यालयाने आपल्याला संस्कार दिले, त्याच ठिकाणी असा ऐतिहासिक टप्पा गाठण्याचा योग हा स्वतः मनोज सानप यांच्यासाठी अनमोल ठरणारा आहे. यावेळी सभागृहात प्रयोग संपल्यानंतर काही क्षण टाळयांचा गजरही थांबणार नाही. उपस्थितांच्या डोळयांत अभिमानाचे आणि कृतज्ञतेचे अश्रू तरळतील. त्या क्षणी सगळयांच्या मनात एकच भावना असेल – आपल्या वीरांना सलाम, आणि त्यांच्या स्मृती जिवंत ठेवणाऱ्या या कलाकाराला सलाम. हे नक्की!

मनोज सानप यांचा पाच हजारावा प्रयोग हा केवळ एका नाट्यप्रयोगाचा टप्पा नाही. तो आपल्या शहीद जवानांच्या त्यागाला वाहिलेली आदरांजली आहे. तो एका कलाकाराच्या अथक जिद्दीचा पुरावा आहे. तो समाजाला योग्य दिशा देणाऱ्या एका शिक्षकाच्या ध्यासाचे प्रतीक आहे. आणि तो एका कृतज्ञ भारतीय नागरिकाची आपल्या मातृभूमीशी असलेली अखंड निष्ठा आहे.

आज जेव्हा आपण या प्रवासाकडे मागे वळून पाहतो, तेव्हा केवळ वाक्य ओठांवर येते, शहीदांना वंदन, मनोज सानपांना अभिनंदन. कारण त्यांचा हा प्रवास आपल्याला सतत आठवण करून देतो की, देशासाठी प्राण देणे हे जसे महान आहे, तसेच देशासाठी प्रामाणिकपणे जगणे हे त्याहूनही मोठे असे मनोज सानप अभिमानाने सांगतात.

# परिवर्तन पॅनल सदस्यांच्या हाती शिवसेनेचे धनुष्यबाण..

## भाजपा पक्षात खळबळ..



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : ठाणे जिल्ह्यात महापालिका व जिल्हा परिषद निवडणुकीचे पडघम वाजू लागल्याने शिवसेना व भाजप पक्षात चढाओढीचे राजकारण सुरू झाल्याचे चित्र दिसू लागले असतानाच मुरबाड नगरपंचायतीमध्ये भाजपा पक्षाच्या अंतर्गत वाद व कुरघोडी मुळे भाजप पक्षामधून बाहेर पडून परिवर्तन पॅनल स्थापन केलेल्या नऊ सदस्यांनी आज " परिवर्तन पॅनल " शिवसेना पक्ष (शिंदे) विलीन करीत शिवसेनेचा धनुष्यबाण हाती घेतले आहे. त्यामुळे भाजप पक्षात असलेले मतभेद पुन्हा उघड झाले आहेत.

भिवंडी तालुक्यातील पडघा येथे शिवसेना नेते प्रकाश पाटील व ठाणे जिल्हाप्रमुख देवानंद थळे यांच्या उपस्थितीत विद्यमान सदस्य माजी नगराध्यक्ष रामभाऊ भगवान दुधाळे,गटनेते मोहन भालचंद्र गडगे,नगरपंचायत उपनगराध्यक्षा दीक्षिता विकास वारघडे,बांधकाम सभापती उर्मिला सुजित ठाकरे,पाणीपुरवठा सभापती स्नेहा सागर आंबवणे,नगरसेविका नम्रता नंदकुमार जाधव ,रविना विनायक राव,अनिता संतोष मारके,यांच्यासह विकास वारघडे,सुजित ठाकरे,नंदकुमार जाधव व कार्यकर्त्यांनी शिवसेना पक्ष प्रवेश केला आहे.याप्रसंगी शिवसेना उपनेते रुपेश म्हात्रे, ठाणे जिल्हाप्रमुख देवानंद थळे, मारुती धिर्डे, भिवंडी शहर प्रमुख (प.)शाम पाटील, संजय काबुकर,वाडा तालुका प्रमुख निलेश पाटील, मुरबाड तालुका प्रमुख कांतिलाल कंठे उपस्थित होते.

जिल्ह्याचा खऱ्याअर्थाने विकास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून होताना आम्ही बघितला आहे.मुरबाड मध्ये सुरू असलेलेल जातीपातीचे राजकारण ,ठराविक सदस्यांना निधी वितरण यामुळे आम्ही वंचित होतो, त्यामुळे आम्ही भाजपपासून वेगळे होत परिवर्तन पॅनल स्थापन केले होते.शिवसेना पक्षाचे प्रमुख उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून खऱ्या अर्थाने ठाणे जिल्ह्याचा विकास होत असल्याने आम्ही शिवसेना पक्षात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला अशी प्रतिक्रिया माजी नगराध्यक्ष रामभाऊ दुधाळे यांनी दिली आहे.

मुरबाड नगरपंचायती मधील परिवर्तन पॅनलच्या सर्व नगरसेवकांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या कर्तृत्वावर विश्वास ठेऊन परिवर्तन पॅनल शिवसेने मध्ये विलीन केल्याची माहिती उपस्थितीत नगरसेवक यांनी पत्रकारांना दिली.ठाणे जिल्ह्यात पक्षाचे अध्यक्ष एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली पक्ष बांधणी व लोक उपयोगी योजना राबविण्यात येत असुन येत्या काळात जिल्हा परिषद व महापालिकेवर शिवसेना झेंडा फडकवणार असल्याची प्रतिक्रिया शिवसेना जिल्हा प्रमुख देवानंद थळे व प्रकाश पाटील यांनी दिली.

# जनसुरक्षा विधेयक रद्द करण्यासाठी भिवंडीत शिवसेनेची निदर्शने

दै.ठाणे जीवनदीप वार्ता /भिवंडी : राज्य सरकारच्या माध्यमातून जनसुरक्षा विधेयक कायदा 2024 लागू करण्यात आला.मात्र हा कायदा लागू केल्यानंतर राज्यभरातून या कायद्याच्या विरोधात राज्यव्यापी आंदोलन सुरु आहेत.भिवंडी शहरात शिवसेना ( ठाकरे ) पक्षाच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज चौकात आज दुपारी शासन विरोधी घोषणाबाजी करीत निदर्शने करण्यात आली.

भिवंडी लोकसभा महिला आघाडी संपर्क संघटिका आशाताई रसाळ,भिवंडी जिल्हाप्रमुख मनोज गगे,शहर प्रमुख प्रसाद पाटील,महानगरप्रमुख अरुण पाटील,महिला संघटिका वैशाली मेस्त्री,राजा पुण्यार्थी ,शहर समन्वय नाना झळके,गणेश मोरे,नितेश दांडेकर,मनिष गिरी यांच्यासह शेकडो शिवसैनिक व महिला वर्ग सहभागी झाले होते.घटना विरोधी,लोकशाही हक्काला नाकारणारा जन सुरक्षा कायदा रद्द करण्यासाठी यावेळी जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.यावेळी अनुचित प्रकार घडू नये यासाठी कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियानांतर्गत तालुकास्तरीय मास्टर ट्रेनर्सचे निवासी प्रशिक्षण

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियानांतर्गत दि.8 ते 10 सप्टेंबर 2025 दरम्यान तालुकास्तरीय मास्टर ट्रेनर्ससाठी निवासी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन प्रादेशिक कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, रामनिधी, खोपोली येथे करण्यात आले. या प्रशिक्षणाचे उद्घाटन (दि.9 सप्टेंबर रोजी) जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्याहस्ते झाले.

या कार्यक्रमास मुख्य कार्यकारी अधिकारी, श्रीमती नेहा भोसले, तहसिलदार कर्जत डॉ.धनंजय जाधव, गटविकास अधिकारी संदीप कराड, सहाय्यक प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय पेण, श्रीमती तेजस्विनी गलांडे हे मान्यवर उपस्थित होते. उद्घाटनप्रसंगी



जिल्हाधिकारी श्री.जावळे यांनी प्रशिक्षणार्थींना संबोधित करताना सांगितले की, रायगड जिल्ह्यातील 113 आदिवासी वाड्यांमध्ये सर्वसमावेशक योजना राबवून वाड्यांचा समृद्ध विकास साधण्याचे उद्दिष्ट आहे. यासाठी त्यांनी सर्व संबंधित अधिकाऱ्यांना आणि मास्टर ट्रेनर्सना आवश्यक त्या उपाययोजना प्रभावीपणे राबवण्याच्या सूचना दिल्या. जिल्हाधिकारी स्वतः प्रत्येक तालुक्यातील दोन वाड्यांना भेट देऊन ग्राम विकास आराखड्यांचा आढावा घेणार असून, सर्व 113 वाड्यांचे आराखडे स्वतः तपासून शासनाकडे सादर करण्यात येतील, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

या तीन दिवसीय प्रशिक्षणामध्ये तालुकास्तरावरील 71 मास्टर ट्रेनर्सना जनजातीय गावांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक कौशल्य व माहिती प्रदान करण्यात आली. प्रशिक्षणामध्ये विविध योजना, समुदाय संवाद, ग्रामविकास आराखडा निर्मिती आणि नेतृत्व क्षमता या विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून जिल्ह्यातील आदिवासी वाड्यांच्या शाश्वत आणि समावेशी विकासासाठी एक महत्वपूर्ण पाऊल उचलले गेले असून या उपक्रमामुळे स्थानिक समुदायाचा सक्रिय सहभाग वाढून, योजनांची प्रभावी अंमलबजावणी होण्यास मदत होणार आहे.

# घरगुती गणेशोत्सवातून सामाजिक बांधिलकीची संकल्पना

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : डोंबिवली जवळील काटई गावातील सामाजिक कार्यकर्ते गजानन पाटील हे त्यांच्या घरगुती गणेशोत्सव दरम्यान *"गणेशोत्सवातून सामाजिक बांधिलकी"* ही संकल्पना मागील १० वर्षांपासून राबवत आहेत. यंदाचे हे ११ वे वर्ष होते. गजानन पाटील यांनी गणेश भक्तांना आवाहन केल्याप्रमाणे त्यांच्या घरी गणपती दर्शनाकरिता येताना गणेश भक्तांनी कोणत्याही प्रकारे हार,फूल, मिठाई वगैरे न आणता आपल्या इच्छेनुसार शैक्षणिक साहित्य बापांच्या चरणी अर्पण करावे जेणेकरून हे जमा झालेले शैक्षणिक साहित्य दुर्गम भागातील गरजू विद्यार्थ्यांना वाटप करता येतील. गजानन पाटील



यांच्या आवाहनाला शिक्षणप्रेमी गणेश भक्तांकडून प्रतिवर्षी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. यंदा सुद्धा मोठ्या प्रमाणावर बाबांच्या चरणी विविध प्रकारे शालोपयोगी शैक्षणिक साहित्य जमा झाले.

हे जमा झालेले शालेय उपयोगी शैक्षणिक साहित्य भिवंडी तालुक्यातील कासणे जिल्हा परिषद शाळेत आदिवासी बांधवांचे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत अशा गरजू विद्यार्थ्यांना मंगळवारी वाटप केले. हे शैक्षणिक साहित्य वाटपापूर्वी आगरी समाजातील प्रसिद्ध निवेदक तथा जादूगर राम पाटील यांचे जादूचे प्रयोग सुद्धा झाले. हे जादूचे प्रयोग शाळेचे विद्यार्थी कुतूहलाने पाहत होते. कारण त्यांनी असे जादूचे प्रयोग यापूर्वी कधीही पाहिले नव्हते.

शैक्षणिक साहित्य वाटपावेळी सामाजिक कार्यकर्ते गजानन पाटील यांच्या सोबत शिक्षण प्रेमी हभप हनुमान महाराज पाटील, हभप महेश संते, जे के पाटील शाळेचे संचालक गजानन पाटील, माजी उपसरपंच फुलचंद पाटील, माजी सरपंच गिरीधर पाटील, जादूगर राम पाटील, कर्सन पाटील, गणेश पाटील, मंगेश खुटाकर, शशी पाटील, सुनिल पाटील, ज्ञानेश्वर चौधरी, युवराज पाटील उपस्थित होते. शैक्षणिक साहित्य वाटपाकरिता कासणे शाळेचे मुख्याध्यापक मनोहर मडके यांच्यासह कासणे ग्रामपंचायत माजी सरपंच विद्यमान सदस्य भावना भोईर व भगवान भोईर, खैरपाडा शाळेच्या मुख्याध्यापिका वैशाली बागुल व खानिवली शाळेच्या मुख्याध्यापिका घायवट यांचे सहकार्य लाभले.

शैक्षणिक साहित्याचे वाटप यावेळी जिल्हा परिषद शाळा कासणे तसेच खाणीवली, बामणे,खैरपाडा या चार गावातील एकूण २५० आदिवासी समाजातील गरजू विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले.









### मेष

काही विशेष कामासाठी लांबचे प्रवास होऊ शकतात. आरोग्याच्या समस्या उद्भवू शकतात. तुम्हाला कुटुंबातील सदस्यांचा पाठिंबा मिळेल.

### वृषभ

वादापासून दूर राहा. नौकरीच्या शोधात असलेल्या जातकांना आनंदाची बातमी मिळेल.आर्थिक परिस्थीची काळजी वाटेल. जुने मित्र भेटतील.

### मिथुन

प्रलंबित कामे पूर्ण होतील.पैसे उधार देणे टाळा. कुटुंबाबतील नात्यात गोडवा राहील. नौकरीच्या ठिकाणी वरिष्ठांशी वाद संभवतात.

### कर्क

कोणतेही नवीन काम करण्यासाठी दिवस कमजोर आहे.कुटुंबीयांसह कुठेतरी बाहेर जाऊ शकता. कुटुंबात एखाद्याचे लग्न ठरतील.

### सिंह

घरातील वातावरण आनंददायी राहील. घरातील वडिलधाऱ्यांशी वाद घालू नका. आज फसवणूक होऊ शकते.कायदेशीर प्रकरणात विजय मिळेल.

### कन्या

वाहन खरेदीचे तुमचे स्वप्न पूर्ण होईल, परंतु अनोळखी व्यक्तीच्या प्रभावाखाली कोणतीही मोठी गुंतवणूक करू नका, अन्यथा व्यवसायासाठी हानिकारक असेल.

### तूळ

कामात कोणताही बदल करू नका अन्यथा नंतर अडचणींना सामोरे जावे लागेल. रागाच्या वागणुकीमुळे तुमचे मन अस्वस्थ राहील.

### वृश्चिक

विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या अडचणींबाबत शिक्षकांशी बोलून दाखवावे लागणार.इकडे तिकडे धावपळ करण्यात व्यस्त असाल .

### धनु

कोणतेही नवीन काम सुरू केले असेल तर ते मध्येच थांबवावे लागेल.मुलांकडून तुम्हाला काही चांगली बातमी मिळू शकते.

### मकर

भागीदारीत काही काम सुरू करणे तुमच्यासाठी चांगले राहील. व्यवसायातील काही अडथळे दूर करण्याचा तुम्ही पूर्ण प्रयत्न कराल.

### कुंभ

कोणालाही न विचारता सल्ला देणे टाळावे लागेल. तुम्ही तुमचे घर, वाहन आणि घर इत्यादीसाठी खरेदी करू शकता.तुमचे कुटुंबीय तुमच्यावर नाराज राहतील.

### मीन

मालमत्ता खरेदी करताना तुम्हाला महत्त्वाच्या गोष्टींकडे पूर्ण लक्ष द्यावे लागेल.कामासाठी तुम्हाला लांबच्या प्रवास घडेल.व्यवसायात तोटे संभवतात.

नियमित वाचा दै. ठाणे जीवनदीप वार्ता

# ठाणे महापालिकेच्या सार्वजनिक गणेशोत्सव आरास स्पर्धेत
# शिवसम्राट मित्र मंडळ पहिल्या क्रमांकाचे मानकरी

**• स्वच्छता पुरस्कारात प्रथम – काजूवाडी वैती नगर रहिवासी मंडळ, काजूवाडी**
**• उत्कृष्ट मूर्तीकाराचा प्रथम क्रमांक –राकेश घोष्टीकर, श्रीरंग सहनिवास गणेशोत्सव मंडळ**

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ठाणे महापालिकेतर्फे दरवर्षीप्रमाणे घेण्यात आलेल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ आरास स्पर्धा २०२५चा निकाल जाहीर करण्यात आला आहे. या आरास स्पर्धेमध्ये ठाण्यातील शिवसम्राट मित्र मंडळाने प्रथम पारितोषिक पटकाविले. तर, कळवा येथील गुणसागर नगर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने दुसरा आणि कोलबाड मित्र मंडळाने तिसरा क्रमांक पटकाविला आहे. काजूवाडी वैती नगर रहिवासी मंडळ, काजूवाडी यांना स्वच्छता पुरस्कारात प्रथम आणि राकेश घोष्टीकर, श्रीरंग सहनिवास गणेशोत्सव मंडळ यांना उत्कृष्ट मूर्तीकाराचा प्रथम क्रमांक मिळाला आहे. स्पर्धेत सहभागी झालेल्या तसेच, विजयी ठरलेल्या सर्व गणेशोत्सव मंडळांचे ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी अभिनंदन केले आहे.

ठाणे महापालिकेच्यावतीने घेण्यात आलेल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ आरास स्पर्धेत ठाण्यातील एकूण १६ मंडळांनी सहभाग घेतला होता. स्पर्धेचे परीक्षण करताना मूर्ती, सजावट, विषय मांडणी, हेतुपूर्ती, शिस्त व स्वच्छता तसेच कलावंतांचे काम या सर्व घटकांचा विचार करण्यात आला. या स्पर्धेचे परीक्षण ज्येष्ठ चित्रकार सदाशिव कुलकर्णी व किशोर नादावडेकर आणि ठाणे वैभवचे ज्येष्ठ पत्रकार आनंद कांबळे यांनी केले.

या स्पर्धेमध्ये प्रथम आलेल्या शिवसम्राट मित्र मंडळाने 'मंडळ आहे ना?' या विषयावर देखावा साकारला होता. तर द्वितीय क्रमांक मिळविलेल्या गुणसागर नगर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने 'रान बोलतंय - जंगलाची शिकवण' या विषयावरील देखावा चित्रफितीच्या माध्यमातून साकारला होता. तृतीय क्रमांक पटकाविलेल्या कोलबाड मित्र मंडळाने 'अवयव व देहदान' या विषयावर देखावा साकारून नागरिकांमध्ये अवयवदानाबाबत जनजागृती केली होती. तर, उत्तेजनार्थ पारितोषिक पटकाविणाऱ्या गोपाळ गणेश मित्र मंडळाने 'पर्यावरण आणि स्वार्थी मनुष्य' या विषयांवरील देखावा साकारून पर्यावरणाचे महत्त्व पटवून दिले.

**या स्पर्धेचा निकाल खालील प्रमाणे.**

**उत्कृष्ट सजावट**
१. प्रथम क्रमांक (रुपये २५ हजार) – शिवसम्राट मित्र मंडळ, गांधीनगर.
२. द्वितीय क्रमांक (रुपये २० हजार) – गुणसागर नगर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, कळवा
३. तृतीय क्रमांक (रुपये १५ हजार) – कोलबाड मित्र मंडळ, कोलबाड.
४. उत्तेजनार्थ (रुपये १० हजार) – गोपाळ गणेश मित्र मंडळ – आझाद नगर.

**उत्कृष्ट मूर्तीकार**
१. प्रथम क्रमांक (रुपये १० हजार) – राकेश घोष्टीकर – श्रीरंग सहनिवास गणेशोत्सव मंडळ
२. द्वितीय क्रमांक (रुपये ७ हजार) – मदन नागोठणेकर – सार्वजनिक उत्सव मंडळ
३. तृतीय क्रमांक (रुपये ५ हजार) – मिलिंद सुतार – जय भवानी मित्र मंडळ

**स्वच्छता पुरस्कार**
१. प्रथम क्रमांक (रुपये १० हजार) – काजूवाडी वैती नगर रहिवासी मंडळ, काजूवाडी
२. द्वितीय क्रमांक (रुपये ७ हजार) – शिवगर्जना मित्र मंडळ, उथळसर
३. तृतीय क्रमांक (रुपये ५ हजार) – स्वातंत्र्यवीर सावरकर मित्र मंडळ, सावरकर नगर


## कल्याण डोंबिवली महानगरपालिका
### उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग

दुरध्वनी क्र. ०२५१-२२०३६२१, विस्तार - २३४

**नोटीस**

कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील खालील नमूद अर्जदाराने विकास कामात बाधित होणारी झाडे तोडणे/पुनर्रोपण करणेस परवानगी मागीतली आहे.

| अ. क्र. | अर्जदाराचे नाव | झाडे तोडावयाचे ठिकाण | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. हरिश्चंद्र पांडुरंग भोई व इतर, श्री.इद्रिस झुजर झोजवाला तर्फे कु.मु.प.धा श्री.जोहर हसन झोजवाला | स.नं. २८३ (पै), स.न. २८४ (पै), स.नं. २८५/१ ब मौजे कल्याण | ०२ | नविन इमारतीच्या प्रवेशद्वारामध्ये बाधित होत असल्याने |

सदरची झाडे तोडण्यास/पुनर्रोपणास परवानगी देणे अगोदर कोणाच्या काही हरकती असल्यास त्या महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ चे कलम ८ (३) अन्वये मागविण्यात येत आहेत. तरी कोणाच्या हरकती असल्यास ७ दिवसाच्या आत उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागात लेखी स्वरुपात योग्य त्या कागदपत्रांसह देण्यात याव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणे / पुनर्रोपण करणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

सही /-
संजय जाधव
वृक्ष अधिकारी
वृक्ष प्राधिकरण विभाग,
कल्याण डोंबिवली महानगरपालिका,कल्याण.

जा.क्र. कडोंमपा/जसंवि/मुका/४८४
दि. १०/०९/२५


## संत राम मारुती महाराज समाधी उत्सवानिमित्त
# सुभेदारवाडा शाळेतील विद्यार्थ्यांचे अथर्वशीर्ष पठण




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण येथील संत राम मारुती महाराज समाधी मंदिरात आज (दि 10) रोजी सुभेदारवाडा प्राथमिक शाळेतील इयत्ता 4थी च्या विद्यार्थ्यांनी अथर्वशीर्ष पठण केले.

महाराजांच्या समाधी उत्सवानिमित्त कल्याणातील दूधनाका येथील समाधी मंदिरात 8 ते 15 सप्टेंबर दरम्यान विशेष सप्ताह सोहळ्याचं नियोजन करण्यात आलं असून मंदिराच्या प्रांगणात विविध कार्यक्रम आयोजित होत आहेत. या पार्श्वभूमीवर शाळेनेही विद्यार्थ्यांचे सामूहिक अथर्वशीर्ष पठण करून महाराजांच्या उत्सवात आपला सहभाग नोंदवला.

यावेळी संत राम मारुती महाराज समाधी मंदिर संस्थानातर्फे शाळेतील शिक्षकांचा महाराजांची प्रतिमा व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला , तसेच विद्यार्थ्यांना शालेय उपयोगी वस्तूंची भेट देण्यात आली. याप्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका कल्पना पोतदार ,जेष्ठ शिक्षक व इयत्ता 4थी चे शिक्षक उपस्थित होते.

# 'पीयूसी नाही, तर इंधन नाही' ची सक्त अंमलबजावणी करा : परिवहन मंत्र्यांचे आदेश



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : प्रदुषणाचा फास वाढत असल्याने पुढच्या पिढीच्या भविष्यासाठी आता सरकारने पीयूसी नसेल तर वाहनांना इंधन न देण्याच्या धोरणाची सक्त अंमलबजावणी करण्याचे आदेश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले आहेत. भविष्यातील पिढीला प्रदूषण मुक्त पर्यावरण देण्यासाठी सध्याच्या पिढीने स्वतः वर पर्यावरण पूरक काही निर्बंध घालून घेणे गरजेचे आहे. त्या उद्देशाने प्रत्येक वाहनाला दिले जाणारे प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र ( PUC ) हे वैध असणे गरजेचे आहे. अवैध प्रमाणपत्र निर्मितीची साखळी पूर्णतः बंद झाली पाहिजे, यासाठी भविष्यात प्रत्येक पेट्रोल पंपावर 'नो पीयूसी नो फ्युएल' उपक्रमाची अंमलबजावणी सक्तीने करण्यात यावी, असे आदेश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले आहे.

## ठाणे महापालिकेत प्रभागरचना आराखड्यावरील
# हरकती व सूचनांवर सुनावणी संपन्न




दै. ठाणे जीवनदीप वार्ता


ठाणे (१०) : महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेने ठाणे महानगरपालिकेच्या प्रभाग रचनेचा प्रारूप आराखडा जाहीर करण्यात आला आहे.

या प्रारुप आराखड्यावर एकूण २७० हरकती आणि सूचना मांडण्यात आल्या. या हरकती व सूचनांच्या सुनावणीसाठी राज्य शासनाने अपर मुख्य सचिव (परिवहन व बंदरे) संजय सेठी यांना प्राधिकृत केले आहे. त्यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी महापालिका मुख्यालय येथील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृह येथे प्रत्यक्ष सुनावणी झाली.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९च्या कलम ५ (३) च्या तरतुदीखाली ठाणे महानगरपालिकेच्या बाबतीत निवडावयाच्या सदस्यांची संख्या व प्रभागांची संख्या निश्चित केली आहे. ठाणे महानगरपालिकेत एकूण सदस्यांची संख्या १३१ आहे. एकूण प्रभागांची संख्या ३३ आहे. त्यापैकी, चार सदस्यीय प्रभागांची संख्या ३२ असून तीन सदस्यीय प्रभागांची संख्या १ आहे. प्रारुप अधिसूचनेद्वारे ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्रभागांची संख्या व त्यांची व्याप्ती निश्चित करण्यात आली आहे. या अधिसूचनेच्या अनुषंगाने नागरिकांना ०४ सप्टेंबरपर्यंत हरकती किंवा सूचना मांडण्याचा अवधी देण्यात आला होता. या अवधीत काळात नोंदवण्यात आलेल्या हरकती आणि सूचना यांच्यावर बुधवारी प्रत्यक्ष सुनावणी झाली.

या सुनावणीसाठी व्यासपीठावर, महापालिका आयुक्त सौरभ राव, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, उपायुक्त (निवडणूक) उमेश बिरारी, सहाय्यक संचालक, नगररचना संग्राम कानडे, सहाय्यक आयुक्त सचिन बोरसे, कार्यकारी अभियंता देवेंद्र नेर आदी उपस्थित होते.

# DBATU विद्यापीठाच्या कुलगुरूंनाच विद्यार्थ्यांचे वावडे ?




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे (DBATU) येथे सध्या विद्यार्थ्यांच्या समस्या गंभीर आहेत. परीक्षा , निकाला संदर्भातील त्रुटी, शुल्कवाढ, अपुऱ्या सुविधा आणि प्रशासकीय ढिसाळपणा याबाबत अनेक वेळा आवाज उठवला गेला. परीक्षा विभागाचा जो काही सावळा गोंधळ आहे त्यातून विद्यापीठ कधी सावरणार मुळात त्या समस्या सोडविण्यासाठी विद्यापीठ प्रशासन तसदी सुद्धा घेत नाही. विद्यार्थ्यांचा निकाल वेळेवर लागत नाही, गुणपत्रिका मिळत नाही, काही विद्यार्थी लांबचा प्रवास करून परीक्षा विभागाच्या चकरा मारून मार्कशिट मिळवतात नंतर लक्षात येत की ही मार्कशिट मुळात त्या विद्यार्थ्याची नव्हेच इतका गलथान कारभार विद्यापीठाचा चालू आहे.

महाराष्ट्रातील सर्वांत मोठी तंत्रशास्त्र विद्यापीठ ४०० हून अधिक महाविद्यालय या विद्यापीठाशी संलग्नित असून महाराष्ट्राच्या काना कोपऱ्यातून विद्यार्थी समस्या घेऊन येत असतात परीक्षा विभागाच्या बाहेर सकाळी चार वाजेपासून रांगेत उभे असतात, परंतु दरदिवशी १० अर्ज स्वीकारली जातात. शेकडो विद्यार्थी समस्या घेऊन येतात मग समस्येच्या पूर्ततेसाठी, आपला प्रश्न सुटेल ही भाबडी आशा मनात बाळगून विद्यार्थ्यांना स्वखर्चाने तीन दिवस मुक्कामी राहावे लागते. त्यांची कोणत्याही प्रकारची निवासाची सोय विद्यापीठा मार्फत केली जात नाही. परीक्षा विभागातील अधिकारी उडवा उडवी ची उत्तरे देतात. बऱ्याचदा विद्यार्थ्यांनी दिलेली अर्ज सुद्धा गहाळ होतात. वारंवार अर्ज, निवेदन तक्रारी देऊन सुद्धा त्या विषयीचे गांभीर्य विद्यापीठाला नाही आहे, अनेक समस्या प्रलंबित राहतात, या सर्व गोष्टींचा विद्यार्थ्यांच्या मानसिकतेवर परिणाम होतो, आत्महत्येचा विचार मनात येतो, आयुष्य घडविण्यासाठी एक विद्यार्थी विद्यापीठात किंवा त्या संबंधित महाविद्यालयात प्रवेश घेतो, तिथे त्याच्यावर अंतिम वर्षांनंतर आयुष्य संपवण्याचे विचार मनात येतात, याला जबाबदार कोण? अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा झाल्यानंतर निकाल वेळेत लागत नाही गुणपत्रिका मिळत नाही कित्येक विद्यार्थ्यांना त्यांच्या मागच्या वर्षातील सत्रांच्या गुणपत्रिका मिळवून देण्यास सुद्धा विद्यापीठ हतबल आहे. यामुळे विद्यार्थ्यांना पुढील उच्च शिक्षणाच्या, व नोकरीच्या संधी साठी मुकावे लागते. या महत्त्वाच्या गोष्टी सुरळीत पार पडत आहे का नाही यावर अंकुश ठेवण्याची नैतिक जबाबदारी कुलगुरूंची नव्हे का?

तथापि, कुलगुरूंनी याकडे वारंवार दुर्लक्ष केले. समस्या इतक्या गंभीर असून कुलगुरू महोदयांनी जाणीवपूर्वक लक्ष देऊन विद्यार्थ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणे अपेक्षित असताना मुळात विद्यार्थ्यांना भेटीसाठी नाकारलं जात. इंग्रजांच्या काळात ब्रिटिश फलक लाऊन सूचित करायचे की Indians and Dogs are not allowed परंतु DBATU विद्यापीठाच्या कुलगुरूंच्या वर्तुणुकीतून जाणून येतं की "Students are not allowed and their problems are not entertained here." विद्यार्थी भेटण्यासाठी प्रयत्न करतो परंतु , सुरक्षा रक्षाका कडून अडवल जात विद्यार्थ्यांना भेटू दिल जात नाही. विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडविण्या ऐवजी कुलगुरू महोदय त्यांच्या वातानुकूलित दालनात बसून लवकरात लवकर आपला पाच वर्षाचा कारभार पूर्ण करण्याच्या तयारीत आहेत. अनेकदा महोदयांचा महाराष्ट्र दौरा सुद्धा असतो विद्यापीठाचा भार एका जवळच्या प्राध्यापकावर सोपवून. आपल्या दायित्वाचे व नैतिक जबाबदारीचे विस्मरण कुलगुरू महोदयांना झाले आहे. अशा प्रकारच्या निष्क्रीय व विद्यार्थी विरोधी कारभाराचा आम्ही तीव्र निषेध करतो आणि प्रशासनाने यावर तत्काळ ठोस पावले उचलावीत, अशी आमची मागणी आहे अन्यथा अखिल भारतीय विद्यार्थी परिषद विद्यार्थ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी सदैव तत्पर आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ म्हणजे महाराष्ट्रातील सर्वांत मोठी आणि एकमेव तंत्रशास्त्र विद्यापीठ या विद्यापीठात असा भोंगळ कारभार चालू आहे म्हणजे हे त्या विद्यापीठात व विद्यापीठाच्या संलग्नित विद्यार्थ्यांचं दुर्दैव. अनेक समस्या विद्यार्थ्यांना असून कुलगुरू मात्र निष्क्रीय. झोपलेल्या प्रशासनाला व कुलगुरूंना विस्मरण झालेल्या दायित्वाची पुनः स्मरण करून देण्यासाठी व विद्यार्थी हितासाठी अभाविप DBATU विद्यापीठात येणाऱ्या काळात तीव्र स्वरूपाचे आंदोलन करेल असे व्यक्तव्य कोकण प्रांत मंत्री राहुल राजौरिआ यांनी व्यक्त केले.

# ठाणे जिल्ह्यातील नागरिकांना घरपोच शासकीय सेवा

▶▶▶ पान ०१ वरून

प्रायोगिक तत्त्वावर सुरू झालेल्या या उपक्रमाला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. आतापर्यंत ४ हजार १३ अर्ज आल्या असून, ३ हजार ६५९ नागरिकांना घरपोच सेवा देण्यात आली आहे. उर्वरित १७० अपॉईंटमेंटवर काम सुरू असल्याबाबतची माहिती जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) प्रमोद काळे यांनी दिली. या उपक्रमामार्फत मिळणाऱ्या प्रमुख सेवा व विभाग: मृत्यू दाखला, जन्म दाखला, दारिद्र्यरेषेखालील दाखला, ग्रामपंचायतीचा येणे बाकी नसल्याचा दाखला, विवाह नोंदणी दाखला, नमुना नं ८ चा दाखला (मालमत्ता फेरफार), निराधार योजनेसाठी वयाचा दाखला हे सर्व लोकहक्क सेवा आयोगांतर्गत येणारे हे सात दाखले 'Door Step Delivery' मार्फत देण्यात येत असून त्या व्यतिरिक्त इतर विभागाचे जसे जातीचा दाखला, अधिवास प्रमाणपत्र, नॉन-क्रिमिलेयर प्रमाणपत्र, उद्योग आधार, जीवन प्रमाणपत्र, शिष्यवृत्ती अर्ज, पॅनकार्ड व दुरुस्ती, पासपोर्टसाठी शपथपत्र, अधिवास प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, शेत मोजणी अर्ज, चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र, राजपत्र प्रकाशन, १५ वर्षांचे रहवासी प्रमाणपत्र, खाद्य परवाना जीवन प्रमाणपत्र, हयात प्रमाणपत्र, आभाकार्ड (आयुष्यमान भारत आरोग्य खाते), शेत मोजणी अर्ज / Farm Measurement Application, डिश टीव्ही डिटीएच रीचार्ज, शिष्यवृत्ती अर्ज (Scholarship Application), केंद्र सरकार ओबीसी प्रमाणपत्र, वारसा प्रमाणपत्र, GST Form, Hotel Licence, टीकीट आरक्षण, निवासी शाळा, परदेशी शिष्यवृति, शासकीय वसतिगृह प्रवेश, अर्थ कुटुंब सहाय्य, नविन कौटुंबिक शिधापत्रिका, महाभरती, नोकरीसाठी नोंदणी (रोजगार व स्वयंरोजगार संचालनालय), भूमिहीन असल्याचे प्रमाणपत्रासाठी अर्ज अशा ४०२ सेवा तर महसूल विभाग, पोलीस/गृह विभाग, भूमि अभिलेख विभाग, अन्न व नागरी पुरवठा विभाग, समाज कल्याण व सामाजिक न्याय विभाग, शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय, शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय, अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण, डिजिटल जीवन प्रमाण, आयकर विभाग, पासपोर्ट-परराष्ट्र व्यवहार मंत्रालय, आरोग्य विभाग, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्यम मंत्रालय, जिल्हा परिषद अशा प्रशासकिय ८० विभागातील 'Door Step Delivery' या प्रणालीद्वारे घरपोच सेवा मिळू शकतात.

ग्रामपंचायतींच्या कार्यरत केंद्रचालक यांना ही जबाबदारी दिली असून यासाठी आपले सरकार सेवा केंद्र मधील केंद्रचालक यांच्यामार्फत कार्यान्वित आहेत. केंद्रचालक नागरिकांकडून वेळ ठरवून त्यांच्या घरी येतात, आवश्यक कागदपत्र स्कॅन करतात आणि ऑनलाइन सेवा प्रक्रिया पूर्ण करतात. सेवा मंजूर झाल्यावर संबंधित प्रमाणपत्र पुन्हा घरपोच पोचवले जाते.

अपॉईंटमेंट व मदतीसाठी तसेच अधिक माहितीसाठी: नागरिकांनी https://thanedoorstep.in/ या संकेतस्थळावरून अपॉईंटमेंट घ्यावी, तसेच मदतीसाठी ८३८०८२२३३३ वर संपर्क साधावा. "नागरिकांनी आपल्या सोयीसाठी या अभिनव उपक्रमाचा लाभ घ्यावा, घरच्या घरी प्रमाणपत्रे व शासकीय सेवा मिळवून वेळ आणि खर्चाची बचत करावी," असे आवाहन ठाणे जिल्हा परिषदेच्या वतीने करण्यात आले आहे.

# भिवंडीत माहेश्वरी महिला समितीतर्फे समाजातील गुरुजनांचा सन्मान

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : देशभर माजी राष्ट्रपती डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिन शिक्षक दीन म्हणून साजरा होत असतानाच भिवंडी शहरात माहेश्वरी समाज महिला समितीतर्फे समाजातील गुरुजनांचा विशेष सन्मान सोहळा श्री.गोपाल कृष्ण मंदिर सभागृहात आयोजित करण्यात आला होता.सदर कार्यक्रमास मोठ्या संख्येने माहेश्वरी समाज बांधव व महिला महिला वर्ग सहभागी झाले होते.समितीच्या अध्यक्ष बबिता द्वारका असावा, माहेश्वरी समाजाचे ठाणे जिल्हा अध्यक्ष तथा स्वयं सिद्धि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महेश सोनी, उपाध्यक्ष सीमा डागा,श्री माहेश्वरी मंडळ अध्यक्ष ओमप्रकाश भूतडा,अविनाश सिकची,कन्हैयालाल पेडीवाल आदि मान्यवर म्हणून उपस्थित होते.या कार्यक्रमात समाजातील शिक्षक शिक्षिकांचा यथोचित सन्मान चांदीची सरस्वती प्रतिमा देऊन करण्यात आला. तर त्यानंतर आयोजित हॅपी टीचर डे या खेळ कार्यक्रमात उपस्थित महिलांनी सहभाग घेतला.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बबिता असावा, सीमा जागेटिया,दिव्या बजाज,रिया झंवर,मनीषा सिकची,शेफाली हेडा,दीपा सारडा,सुनीता चांडक,रक्षा करवा,सुधा सारडा,शीला डागा,गायत्री तोषनीवाल,जागृति कलंत्री,राजेश्वरी राठी,प्रीति सोमानी,सुनीता सोमानी यांनी विशेष मेहनत घेतली.



## ठाणे जिल्हा कलाध्यापक संघाचे एक दिवसीय कृती सत्र

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामीण(नरेंद्र पाटील) : जिल्हा परिषद ठाणे, (माध्यमिक शिक्षण विभाग) व कलाध्यापक संघ ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय कला विषयक मार्गदर्शन व विचार विनिमयाचे कृती सत्र सोमवार दिनांक 15 सप्टेंबर 2025 रोजी कल्याण येथील कर्णिक रोडवरील नूतन विद्यालयात संपन्न होत आहे या कृती सत्रात कला शिक्षकांसाठी मार्गदर्शन तसेच एलिमेंटरी व इंटरमिजिएट ग्रेड परीक्षा विषयाचे प्रात्यक्षिके तज्ञ कलावंतांद्वारे सादर करण्यात येणार आहे या कृती सत्रात ठाणे जिल्ह्यातील पाच गुणवंत कला शिक्षकांना कलाक्षेत्रातील अत्यंत मानाचा "कलातपस्वी" पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. या कार्यशाळेस ज्ञानेश्वर म्हात्रे सर ,आमदार कोकण शिक्षक मतदार संघ, निरंजन डावखरे आमदार कोकण विभाग पदवीधर मतदार संघ, , किशोरजी इंगळे कला संचालक महाराष्ट्र राज्य, देवीदास महाजन शिक्षणाधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद ठाणे, भारतजी बोरनारे प्रशासन अधिकारी शिक्षण कल्याण डोंबिवली महानगरपालिका, दिगंबर बेंडाळे राज्य सरचिटणीस महाराष्ट्र राज्य कलाध्यापक संघ महामंडळ, सुधीर घागस अध्यक्ष शिक्षण क्रांती संघटना या प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न होणार आहे. तरी ठाणे जिल्ह्यातील जास्तीत जास्त कला शिक्षकांना या कलाविषयक कृती सत्रासाठी उपस्थित राहण्यासाठी आवाहन ठाणे जिल्हा कलाध्यापक संघाकडून करण्यात येत आहे.

## चैतन्य विद्यालयात स्वयंशासन दिनाने विद्यार्थ्यांना जबाबदारीचा अनुभव




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ओतूर : भारताचे माजी राष्ट्रपती व भारतरत्न डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णण यांची जयंती ग्रामविकास मंडळ ओतूर संचलित चैतन्य विद्यालयात स्वयंशासन दिन म्हणून साजरी करण्यात आली. या विशेष दिवशी विद्यार्थ्यांनी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भूमिका स्वीकारून शालेय कार्याची जबाबदारी पार पाडली. एक दिवसाचे मुख्याध्यापक म्हणून तन्वी पंडोरे हिने जबाबदारी सांभाळली, अशी माहिती विद्यालयाच्या मुख्याध्यापिका राजश्री भालेकर यांनी दिली.

विद्यार्थी शिक्षकांची निवड मुलाखत पद्धतीने करण्यात आली. त्यानुसार उपमुख्याध्यापक म्हणून आराध्य भाऊसाहेब खाडे, श्रद्धा शैलेश ढमाले, आणि पर्यवेक्षक म्हणून प्रणव संपत ढमाले, गंधर्व पानसरे यांनी दिवसभर कार्य केले.

विद्यार्थी शिक्षक ईश्वरी ढमाले, सलोनी वामन, आदित्य बोरुडे यांनी मनोगते व्यक्त करताना सांगितले की, "शिक्षक होणे सोपे नाही. त्यासाठी प्रचंड मेहनत, सखोल अभ्यास आणि स्वतःवर विश्वास असणे आवश्यक आहे. शिक्षक आपल्या शिक्षणासाठी किती कष्ट करतात, कोणत्या अडचणींना सामोरे जातात आणि त्या सोडविण्यासाठी किती प्रयत्न करावे लागतात, याची जाणीव आज आम्हाला झाली. कोणताही विषय शिकविणे सोपे नाही; त्यासाठी अभ्यास आवश्यक आहे. प्रत्येक विषयाचा सखोल अभ्यास करूनच शिक्षक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात. आम्हाला एक दिवस शिक्षक होण्याची संधी दिल्याबद्दल विद्यालयाचे मनःपूर्वक आभार मानतो. या स्वयंशासन दिनाचे संपूर्ण नियोजन भाऊसाहेब खाडे आणि अजित डांगे यांनी पाहिले. कार्यक्रमाला ग्रामविकास मंडळाचे सचिव प्रदीप गाढवे, पंकज घोलप, राजश्री भालेकर, संजय हिरे, अनिल उकिरडे यांच्यासह सर्व शिक्षक उपस्थित होते. त्यांचा सत्कार विद्यार्थी शिक्षकांच्या वतीने करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन संस्कृती अहिनवे हिने केले तर आभार प्रदर्शन अनुश्री तांबे हिने मानले.

# कर्जत येथे 'हलाल टाउनशिप' विरोधात आंदोलन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड जिल्ह्यात कर्जतजवळील नेरळ येथे उभारण्यात येणाऱ्या 'सुकून एम्पायर–'हलाल लाइफस्टाइल टाउनशिप' या धर्माधारित गृहप्रकल्पाला हिंदु जनजागृती समितीने तीव्र विरोध दर्शविला आहे. 'केवळ मुस्लिमांसाठी' अशी जाहिरात करणारा हा प्रकल्प संविधान, कायदा आणि सामाजिक सलोख्याच्या पूर्णपणे विरोधात असल्याने त्या प्रकल्पावर तात्काळ बंदी घालावी, अशी मागणी हिंदु जनजागृती समितीने केंद्रीय गृहमंत्री आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि राज्य विकास मंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. हिंदु जनजागृती समितीसह समविचारी संघटनांनी ९ सप्टेंबर या दिवशी कर्जत पोस्ट ऑफिस जवळ हिंदू राष्ट्रजागृती आंदोलन करण्यात आले. यावेळी आंदोलन करताना विश्व हिंदू परिषद, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान, गोरक्षक दल-खालापूर, सनातन संस्था आणि हिंदु जनजागृती समिती आदी संघटनांच्या प्रतिनिधींसह राष्ट्र आणि धर्मप्रेमी नागरिक उपस्थित होते.




राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने (NHRC)ही या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत महाराष्ट्र शासनाला नोटीस बजावली आहे. आयोगाने या प्रकल्पाला समाजात विषप्रसार करणारा आणि देशात 'राष्ट्रांतर्गत राष्ट्र' तयार करण्याचा प्रयत्न असल्याचे म्हटले आहे. तसेच राज्य सरकारने दोन आठवड्यांत कार्यवाही अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

समितीने स्पष्ट केले आहे की, 'सुकून एम्पायर'प्रमाणे धर्माधारित प्रकल्प भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १५ चा उल्लंघन करतात, कारण ते धर्माच्या आधारावर भेदभाव करतात. तसेच रिअल इस्टेट (रेरा) कायद्यानुसार जाहिरात भेदभावरहित व पारदर्शक असणे आवश्यक असते, पण या प्रकल्पाचा प्रचार केवळ एका धर्मासाठी होत असल्याने कायद्याचा भंग होतो. अशा धर्माधारित वसाहतींमुळे समाजात कृत्रिम विभाजन वाढते आणि सामाजिक शांततेला धोका निर्माण होतो, असे समितीने म्हटले आहे.

हिंदु जनजागृती समितीने सरकारकडे तातडीने उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच या प्रकरणी विकासकाचा महा-रेरा परवाना रद्द करावा आणि प्रकल्पाला परवानगी देणाऱ्या प्रशासनातील अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई करावी.

### कर्जतजवळील 'सुकून एम्पायर – हलाल टाउनशिप' या धर्माधारित गृहप्रकल्पांवर बंदी घाला !

**– हिंदु जनजागृती समितीची मागणी**

इतका मोठा प्रकल्प स्थानिक प्रशासन आणि गुप्तचर यंत्रणांच्या लक्षात न आल्याबद्दल स्वतंत्र चौकशी करावी. प्रकल्पासाठी वापरले गेलेले आर्थिक स्रोत, विशेषतः FCRA आणि CSR निधी यांची पारदर्शकपणे तपासणी करावी, अशीही मागणी समितीने केली आहे.

भविष्यात अशा प्रकल्पांवर पूर्ण बंदी घालून महाराष्ट्रात सर्वसमावेशक शहरी नियोजनासाठी स्पष्ट धोरण जाहीर करावे, अशी समितीची देखील मागणी आहे. समितीने म्हटले आहे की उत्तर प्रदेशने हलाल प्रमाणीकरणावर बंदी घालून समांतर अर्थव्यवस्थेला आळा घातला आहे; महाराष्ट्रानेही धर्माधारित गृहनिर्माण प्रकल्पांवर त्वरित बंदी घालून सामाजिक एकात्मता राखण्यासाठी ठोस पावले उचलावीत, असेही समितीने म्हटले आहे.

# विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच इतर कलागुणांनाची जोपासना करावी

**: डॉ. संजय वाघ**

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : विद्यार्थ्यांनी अभ्यासा बरोबरच इतर कलागुणांनाची जोपासना करणे खूप महत्त्वाचे आहे. यातुनच पुढे भविष्यात त्यांना व्यावसायिक संधी प्राप्त होऊ शकतात आणि प्रसिद्ध कलाकार निर्माण होतात. असे जिल्हास्तरीय कला उत्सव स्पर्धामध्ये डायटचे प्राचार्य डॉ. संजय वाघ यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था राहटोली यांच्या संयुक्त विद्यमाने बी. एन. बांदोडकर कॉलेज, ठाणे येथे दिनांक 9 सप्टेंबर 2025 रोजी जिल्हास्तरीय कला उत्सव स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळा अध्यक्ष म्हणून डाएटचे प्राचार्य डॉ.संजय वाघ, बांदोडकर कॉलेजच्या प्राचार्या डॉ.विंदा मांजरमकर, उपप्राचार्या डॉ.प्रीती जांभूळकर, अधिव्याख्याता डॉ.दिनेश चौधरी, डॉ.प्रभा खरटमोल उपस्थित होते.



या स्पर्धेमध्ये नाट्य, नृत्य, गायन, वादन, चित्रकला व कथाकथन अशा विविध स्पर्धांचा समावेश करण्यात आला होता. सदर स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांची तालुका स्तरीय स्पर्धा घेण्यात आली होती आणि त्यातून प्रथम क्रमांकाचे जिल्ह्यातील 12 गटातील 9वी ते 12 वी चे 150 विद्यार्थी जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी उपस्थित होते.

यावेळी बिपिन धुमाळे, ऋतुजा गायकवाड, विशाल राऊत, योगेश गायकवाड, राजकुमार पाटील, प्रकाश साटम, विनय चौगुले, फ्रॅन्क कोलासो, डेनिस बरबोद, संतोष आगटे, बाबूराव महाजन, प्रतिक्षा बोर्डे, प्रदीप मरेवाड, माणिक जाधव, ज्ञानदीप भोईनकर, सपन वाघ, सुजाता झाजम, अनिल आठवले यांनी स्पर्धेचे परीक्षण केले.

स्पर्धेचे जिल्हा प्रमुख अधिव्याख्याता संतोष दौंड यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व श्रीमती सारिका तेलवणे यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाचे व्यवस्थापन दिलीप शेवाळे, कांचन गायकवाड, संजय पाटील, प्रविण कदम, रोहिणी काकडे, वृषाली सावंत यांनी केले. यावेळी मान्यवरांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना राज्य स्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# साखर चौथ का साजरा केला जातो?

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : साखर चौथ हा महाराष्ट्रातील पेण, उरण आणि पनवेल या तालुक्यांत साजरा केला जाणारा गणेशोत्सव आहे, जो अनंत चतुर्दशीनंतर येणाऱ्या संकष्टी चतुर्थीला (साखर चौथ) असतो. या दिवशी गणेशमूर्तींची स्थापना केली जाते आणि दुसऱ्या दिवशी मूर्तींचे विसर्जन होते, तर काही गणपती अडीच ते पाच दिवसांपर्यंत बसवले जातात. या गणपतींना गौरा गणपती असेही म्हणतात.

**साखर चौथ का साजरा केला जातो?**

धार्मिक महत्त्व : साखर चौथ हा संकष्टी चतुर्थीचाच एक भाग आहे, जो गणेशाला समर्पित आहे आणि अडथळे दूर करणारा देव म्हणून त्याची पूजा केली जाते.

सांस्कृतिक परंपरा : हा उत्सव प्रामुख्याने आगरी समाजात साजरा होतो आणि गणपती बाप्पांचे विसर्जन झाल्यानंतर गणरायाचे स्वागत करण्याच्या परंपरेचा हा एक भाग आहे.

साखर चौथची वैशिष्ट्येः गणेशमूर्तींची स्थापना : अनंत चतुर्दशीनंतर येणाऱ्या संकष्टी चतुर्थीला या गणपतींची स्थापना केली जाते.

कालावधी : काही गणपती दीड दिवसांचे, तर काही अडीच ते पाच दिवसांपर्यंतचे असतात.

गौरा गणपतीः या साखर चौथच्या गणपतींना गौरा गणपती असेही म्हणतात.

स्थळ : हा उत्सव प्रामुख्याने महाराष्ट्रातील पेण, उरण आणि पनवेल या भागांत केला जातो.



ॐ मित्र मंडळ वडगाव पेण येथील वडगावचा राजा स्थानापन्न



पेण वडगाव येथे केंद्रप्रमुख ज.स.म्हात्रे यांच्या निवासस्थानी स्थानापन्न झालेला गणपती बाप्पा

# नवी मुंबई विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव द्या अन्यथा उदघाटन होऊ देणार नाही

**– खा. सुरेश म्हात्रे**

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामीण : नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते स्व.दि.बा.पाटील यांचे नाव द्या अन्यथा विमानतळाचे उदघाटन होऊ देणार नाही असा इशारा भिवंडी लोकसभा खासदार सुरेश म्हात्रे (बाळ्या मामा ) यांनी दिला आहे.

राज्य सरकार बरोबरच इतर राजकीय पक्ष, संघटना व स्थानिक भूमिपुत्र सकारात्मक असतानाही केंद्र सरकार त्याकडे दुर्लक्ष करत असून विमानतळाला दि.बा पाटील यांचे नाव देण्याबाबत जाणीवपूर्वक चालढकल व वेळकाढू पणा करत आहे लोकनेते स्व.दि.बा. यांचे समाज कार्य केवळ नवी मुंबई किंवा ठाणे पालघर जिल्ह्यापुरती मर्यादित नव्हते तर दि.बा.पाटील यांच्यामुळे देशात स्त्री भ्रूण हत्या कायदा पारीत झाला, प्रकल्प ग्रस्त शेतकऱ्यांना जमिनीच्या बदल्यात जमीन अथवा भरीव मोबदला देण्याचे कार्य देखील त्यांनी केले असून देश स्वातंत्र्यापूर्वी त्यांनी कुळ कायदा करण्यासाठी इंग्रजांविरोधात आंदोलन केले. यावेळी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्या आंदोलनाची दखल घेतली होती, देश स्वातंत्र्यानंतर कुळ कायदा मंजूर झाला ज्याचा फायदा आज देशातील सर्व शेतकऱ्यांना होत आहे.

ओबीसी आरक्षणासाठी देखील दि.बा. पाटील यांचे मोठे योगदान आहे.हदि. बा.पाटील हे पाच वेळा आमदार, दोन वेळा खासदार,राज्याच्या विधान सभेचे विरोधी पक्षनेते असा त्यांचा राजकीय, सामाजिक व कृषी क्षेत्रात मोठे योगदान आहे. ते केवळ ठाणे पालघर जिल्ह्या पुरती



मर्यादित नसून एक थोर समाज सुधारक म्हणून त्यांच्याकडे पहिले पाहिजे आणि त्यासाठीच नवी मुंबई विमानतळाला त्यांचे नाव द्यावे अशी मागणी खासदार सुरेश म्हात्रे यांनी केली आहे.

दरम्यान, रविवारी १४ सप्टेंबर रोजी लोकनेते स्व.दि.बा.पाटील यांची जन्मशताब्दी वर्ष असून या निमित्त नवी मुंबई विमानतळाला त्यांचे नाव मिळावे यासाठी व त्यांना अभिवादन करण्यासाठी भिवंडी ते नवी मुंबई जासई गाव अशी भव्य कार रॅली काढण्यात येणार असून या कार रॅलीत किमान दोन हजारांहून अधिक चार चाकी गाड्या असणार आहेत. या कार रॅलीत ठाणे,पालघर,रायगड,नवी मुंबई,मुंबई येथून हजारोंच्या संख्येने आगरी- कोळी बांधव उपस्थित राहणार आहेत. हि कार (चारचाकी) रॅली केंद्र सरकारला जागे करण्यासाठी असणार असून हा केवळ ट्रेलर आहे, आम्हाला पिच्चर दाखवायला भाग पाडू नका त्यामुळे जो पर्यंत विमानतळाला नाव दिले जाणार नाही तो पर्यंत विमानतळाचे उदघाटन होऊ देणार नाही असा इशारा म्हात्रे यांनी दिला असल्याचे दिलेल्या प्रसिद्धी माध्यमाद्वारे म्हटले आहे.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!

| | | |
|---|---|---|
| १ | बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) | कालावधी १ वर्ष |
| २ | पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) | कालावधी १ वर्ष |
| ३ | जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) | कालावधी १ वर्ष |
| ४ | डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) | कालावधी २ वर्ष |
| ५ | सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११९२४) | कालावधी ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप
WhatsApp Channels
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई ■ नवी मुंबई ■ ठाणे ■ पालघर ■ रायगड
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.

# डॉ. सुनीलदत्त गवरे यांच्या 'कारणकार्य सिद्धांत'पुस्तकाचे प्रकाशन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

अहमदपूर : माणसाचा जीवनातील गुरु व मार्गदर्शक म्हणून नेहमी माणसाला साथ देईल अशी गोष्ट म्हणजे पुस्तक! अनेक थोर समाज सुधारकांनी वाचाल तर वाचाल; हा संदेश संपूर्ण समाजात पसरवला. दिनांक ०९- ०९- २०२५ रोजी डॉ. सुनीलदत्त गवरे यांनी लिहिलेले कारणकार्य सिद्धांत या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. सकाळी १०.०० वाजता महात्मा फुले महाविद्यालय अहमदपूर येथे राष्ट्रीय परिषदेमध्ये हा प्रकाशन सोहळा पार पडला प्रा. डॉ. नागोराव कुंभार (माजी अध्यक्ष महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषद) यांच्या शुभहस्ते या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. या पुस्तकाचे प्रकाशक श्रीनिकेत सांबरे हे देखील या प्रकाशन कार्यक्रमाला उपस्थित होते. मा. पी. टी. शिंदे (सचिव, के. एस. पी. एम. उदगीर) डॉ. के. वरलक्ष्मी (उपसंचालक, संस्कृत अकादमी, उस्मानिया विद्यापीठ हैदराबाद) डॉ. वसंत बिरादार (प्राचार्य एम. पी. एम. अहमदपूर) डॉ. वेदप्रकाश डोणगावकर (उपाध्यक्ष, महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषद) हे उपस्थित होते.



या पुस्तकाची प्रस्तावना डॉ. सुरेंद्र गायधने माजी विभागप्रमुख राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर व डॉ. शर्मिला विरकर तत्त्वज्ञान विभाग मुंबई विद्यापीठ यांनी केली आहे.सर्वांचे सहकार्याने सदरचा पुस्तक प्रकाशन सोहळा अतिशय उत्साहात पार पडला.

Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com * RNI NO : MAHMAR/2016/72091 * Postal Reg. No. THC/256/2022-2024